# मराठी (आंतरभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (मार्च 2020)
## (आदर्श उत्तरांसह)

**वेळ : 2 तास]** **[एकूण गुण : 40**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

*(i) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(ii) आकृत्या पेनानेच काढाव्यात.*

*(iii) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.*

*(iv) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

---

### विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) आकृती पूर्ण करा :**

(i) **लेखिका हे पदार्थ उचलून फुलात ठेवत** → ☐ ☐ ☐ ☐ 2

(ii) **लेखिका कागद-पेन म्हणून वापरत असणारी वनस्पती** → ☐ 1

शाळेची घंटा झाली, की सर्व मुले-मुली जेवायला बसत. मी त्यांच्या तोंडाकडे बघत बसे. पोटात भूक लागलेली असे. मुले-मुली जेवण करून खेळायला गेल्या, की मी लाडूचा तुकडा, भुरका, गुळाचा खडा, जिलेबीचा तुकडा मातीतून फुलात उचलून ठेवत असे. सर्वांना वाटायचं, मी चाफ्याची फुलंच गोळा करते; पण त्या फुलातला माती लागलेला तो अन्नाचा कण चाफ्याच्या सुगंधाने चवदार व गोड लागायचा. त्यावर घोटभर पाणी पिऊन मी वर्गात बसायची. आमच्या चिखलदऱ्यात भराडी नावाची एक वनस्पती येते. चांगलं तळहाताएवढं मोठं पान असतं. त्याला खाली एक काटा असतो. त्या भराडीचा काटा हे माझं पेन व भराडीचं पान हा माझा कागद असे. म्हशीमागे जात जात अ, आ, इ, ई, उ, ऊ अशी अक्षरं लिहिणं मी शिकू लागले. असं निसर्गाच्या सोबतीनं लिहिलं, म्हणून शिकलेलं कधीच विसरता नाही आलं.

**(2) स्वमत :** 3


- सिंधुताईंना शिकण्याची खूप तळमळ होती, हे तुमच्या शब्दांत पटवून द्या.

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) आकृती पूर्ण करा :** 2


**राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आलेल्या पक्ष्यांची नावे** → ☐ ☐ ☐ ☐

**(2) आकृती पूर्ण करा :** **2**




| वन्य पशुपक्षी ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहे, तिच्या रक्षणाकडे आम जनतेचे लक्ष वेधावे यासाठी सरकारने प्रत्येक राज्याचे अभिप्राय मागवले. वृत्तपत्रांतून अभिप्राय मागवण्यात आले आणि अशा रितीने अनेक पक्ष्यांची नावे राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आली. त्यात गरुड, हंस, महासारंग आदी पक्ष्यांचीही नावे होती. अनेक पक्ष्यांच्या नावांतून एक नाव निवडण्यासाठी अनेक कसोट्या लावण्यात आल्या. त्या सर्व कसोट्यांत मोर उत्तीर्ण झाला आणि 'राष्ट्रीय पक्षी' म्हणून त्याची निवड करण्यात आली. या कसोट्या लावताना ऐतिहासिक प्रणाली, काव्याची पार्श्वभूमी, लोकांची आवड इत्यादी बाह्य कारणांबरोबरच रंग, शरीरसौष्ठव, कलात्मकता, कंठस्वर आदी पक्षीवैशिष्ट्यांचाही विचार करण्यात आला आणि त्यात 'राष्ट्रीय पक्षी' हा मानाचा किताब देण्यास 'मोर' हाच पक्षी योग्य आहे, असे ठरवण्यात आले. |
|---|

**(3) आकृतिबंध पूर्ण करा :** **2**




## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**(1) उत्तरे लिहा :** **2**

(i) नारळाच्या आतमध्ये असणारे -------------.

(ii) अभंगात उल्लेखलेली फुले व फळे -------------, -------------.

| | |
|---|---|
| केकतीला कांट्याचे वेढे।<br>भितरीं निपजती केवडे।<br>तैसे साधूचे शब्द गाढे।<br>परोपकारालागीं॥<br>फणस सर्वांगीं कांटवले।<br>भितरीं महा गोडीनें कोंदले।<br>तैसें साधुहृदय जालें।<br>बोधासंगें परियेसा॥ | नारळ कठीण दिसे बाहेर।<br>भितरीं खोबरें अरुवार।<br>तैसें साधूचें अंतर।<br>बोधें वोसंडले॥<br>ऐसा सद्गुरुशीं धरा भाव।<br>तो कैसा करावा उपाव।<br>शेखमहंमद सांगती सेव।<br>सभे श्रोत्यांप्रती॥ |

**(2) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** **2**

केकतीला कांट्याचे वेढे।
भितरीं निपजती केवडे।
तैसें साधूचे शब्द गाढे।
परोपकारालागीं।।

**प्र. 2. (आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) उत्तरे लिहा :** **2**

(i) कवीने जपायला सांगितलेली गोष्ट – --------------------

(ii) सर्वदूर ललकारी देण्यासाठी वापरावयाचे साधन – --------------------

हा देश माझा याचे, भान जरासे राहू द्या रे ।।धृ।।
हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
ह्या गंगा, यमुना, शेती, धरती, बागबगीचा माझा
अभिलाषा यांची धरिता, कुणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया, स्फुरण आपल्या बाहू पावू द्या रे ।।१।।

जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहिसा अर्थही येऊ द्या रे ।।२।।

जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणुसकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी, फुंकारे एक तुतारी
संदेश रोष जे, द्वेष मनातील वाहून जाऊ द्या रे ।।३।।

**(2) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** **2**

जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला.

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) पुढील वाक्यांचा काळ ओळखून लिहा :** **2**

(i) अरमानने दुसरे पेन घेऊन काम सुरू केले.

(ii) झाडांवर फुले हसू लागतील.

**(2) वाक्प्रचार :** **2**

पुढील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा :

| वाक्प्रचार | वाक्प्रचाराचे अर्थ |
|---|---|
| (i) गाऱ्हाणी सांगणे | (अ) गर्जना करणे |
| (ii) भांबावून जाणे | (आ) तक्रारी करणे |
| | (इ) गोंधळून जाणे |

**प्र. 3. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

- **शब्दसंपत्ती :**

**(1) समानार्थी शब्द लिहा :** **1**

(i) रात्र = ------------------ (ii) निद्रा = ------------------

**(2) पुढील शब्दांतील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द लिहा :** **1**

वजनदार → ---------------------- ----------------------

**(3) अचूक शब्द ओळखून लिहा :** **1**

सौदर्य/सौंदर्य/सौंर्दय/संवदर्य.

**(4) पुढील विरामचिन्हांची नावे लिहा :** **1**

| विरामचिन्हे | विरामचिन्हांची नावे |
|---|---|
| (i) ? | ---------------------- |
| (ii) . | ---------------------- |

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**प्र. 4. (अ) पत्रलेखन :** **4**

***खूशखबर! खूशखबर! खूशखबर!***

नित्यानंद हायस्कूल
सुदर्शन नगर, औरंगाबाद

**चला मुंबईला**

कालावधी :
25 डिसेंबर ते 30 डिसेंबर

नाव नोंदणी :
1 डिसेंबर ते 5 डिसेंबर

शुल्क : प्रत्येकी ₹1000/-

**: सहल प्रमुख :**
राजेश पाटील
**संपर्क :** nityahighschool1002@gmail.com

यश / रेश्मा गोरे – मुलगा/मुलगी या नात्याने सहलीला जाण्यासाठी परवानगी मागणारे पत्र वडिलांना लिहा.

***किंवा***

यश / रेश्मा गोरे – विद्यार्थी या नात्याने सहल प्रमुखांना सहलीसाठी आपले नाव नोंदणी करण्याबाबत विनंती करणारे पत्र लिहा.

**प्र. 4. (आ) पुढीलपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** **4**

**(1) पुढील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न असे तयार करा की ज्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील :**

निसर्गातील प्रत्येक दृश्य माणसाच्या मनाला आनंदित करणारे आहे. सूर्यास्ताच्या वेळी आकाशात अवर्णनीय शोभा दिसते. सूर्यबिंब लालभडक झालेले असते आणि मेघांच्या पटलावर संध्यारागाच्या अनंत छटा पसरलेल्या असतात. किलबिलाट करीत घरट्यांकडे पक्षी परतत असतात. सकाळी भिन्न-भिन्न मार्गांनी उडालेले हे पक्षी संध्याकाळी मात्र गटागटाने घरट्याकडे येतात. रानावनात चरावयास गेलेली गुरेढोरे सुद्धा आतुरतेने घराकडे येत असतात.

त्यांच्या गळ्यांतील घंटानाद कानाला तृप्त करतो. त्याच वेळी त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ वातावरणातील लाल रंगात मिसळते आणि वातावरणाला पवित्र करते. मंदमंद वाऱ्याच्या झुळका झाडे-वेलींना हिंदळवतात. हळूहळू काळोखाची मखमल धरती पांघरते आणि सारे विश्‍व विश्रांतीत रममाण होते.

**(2) जाहिरातलेखन :**

- **'गिरीभ्रमण टूर्स' यांच्यातर्फे 'राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती' या सहलीसाठी जाहिरात तयार करा.**

(3) **बातमीलेखन :**

- **पुढील विषयावर बातमी तयार करा :**

'शहरात डेंग्यूचा वाढता फैलाव, आरोग्य विभागाकडून उपाययोजना.'


(4) **कथालेखन :**

- **पुढील शब्दांच्या आधारे कथालेखन करा :**

**मुद्दे :** वृद्ध शेतकरी — आंब्याचे रोप — नातवाचा प्रश्न — शेतकऱ्याचे उत्तर — नातवास शिकवण.


**प्र. 4. (इ) पुढीलपैकी *कोणत्याही एका* विषयावर निबंधलेखन करा : (शब्दमर्यादा 80 ते 100 शब्द)** **4**

**(1) वर्णनात्मक :**




**(2) आत्मकथन :**

- **पुढील घटक (फूल) तुमच्याशी बोलत आहे, अशी कल्पना करून फुलाचे आत्मकथन लिहा :**



# बोर्डाच्या कृतिपत्रिकेची उत्तरे (मार्च 2020)

## विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) **लेखिका हे पदार्थ उचलून फुलात ठेवत**

- लाडूचा तुकडा
- भुरका
- गुळाचा खडा
- जिलेबीचा तुकडा

(ii) **लेखिका कागद-पेन म्हणून वापरत असणारी वनस्पती** → भराडीचे पान व भराडीचा काटा

**(2)** लहानपणापासून सिंधुताईंना शिकण्याची खूप तळमळ होती. 'मला शाळेत जायचंय' असे त्या नेहमी म्हणत. त्या जिद्दीने शिकल्या. त्यांना वाचनाची भारी आवड होती. सासरच्या घरातील माणसे निरक्षर असल्यामुळे लेखिका स्वत:ची वाचनाची हौस पुरवू शकत नव्हत्या. सासरच्यांच्या जाचातून सुटका मिळवण्यासाठी त्या पुढे पुढे चोरून वाचायला लागल्या. त्यासाठी त्यांनी युक्ती शोधली. वाण-सामानाचे कागद त्या चोळामोळा करून उंदीर-घुशीच्या बिळात दडवून ठेवत. वाचनाच्या त्या अत्यंत भुकेल्या होत्या. एकदा गदिमांची कविता असलेला एक छापील कागद त्यांना सापडला. त्या ओळींनी त्यांच्यावर मोहिनी केली. तो कागद बिळात लपवून ठेवताना त्यांच्या हाताला मुंगूस चावले. त्यांना वाचनाची ओढ होती. त्यांनी प्रवाहाच्या विरुद्ध वाटचाल केल्यामुळे त्यांना खूप मानसिक त्रास सोसावा लागला. शिक्षणाच्या अनोख्या पाऊलवाटेवर त्यांचे मन रक्तबंबाळ झाले. पण त्या ज्ञानाच्या ओढीने त्यांना संकटातून बाहेर काढले.

**प्र. 1. (आ)**

**(1)** **राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आलेल्या पक्ष्यांची नावे**

- गरुड
- हंस
- महासारंग
- मोर

**(2)** **'राष्ट्रीय पक्षी' निवडताना लावलेल्या बाह्य कसोट्या**

- ऐतिहासिक प्रणाली
- लोकांची आवड

**(3)** **'राष्ट्रीय पक्षी' हा मानाचा किताब मिळवण्यासाठी मोराकडे असलेली पक्षीवैशिष्ट्ये**

- रंग
- शरीरसौष्ठव
- कलात्मकता
- कंठस्वर

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) नारळाच्या आतमध्ये असणारे मऊ खोबरे.

(ii) फुले → केतकी; फळे → फणस व नारळ.

**(2)** सरळ अर्थ : केतकीच्या झाडाला काट्यांनी वेढलेले असते; परंतु आत मात्र सुगंधी केवडा जन्माला येतो. त्याप्रमाणे उपदेश करताना साधू-सज्जनांचे शब्द वरून कठोर; पण आतून मायाळू असतात. असा कठोर असला तरी हितकारी परोपकार साधू करतात.

**प्र. 2. (आ)**

**(1)** (i) कवीने जपायला सांगितलेली गोष्ट – माणुसकीची नाती.

(ii) सर्वदूर ललकारी देण्यासाठी वापरावयाचे साधन – तुतारी.

**(2)** सरळ अर्थ : मातृभूमीचा अभिमान भारतीयांनी कसा बाळगावा याविषयी मार्गदर्शन करताना कवी म्हणतो – हिंसा करण्यासाठी, एकमेकांना मारण्यासाठी तुमचे जे हात दगडांचा मारा करायला हपापलेले आहेत; तेच हात देशकार्य करण्यासाठी वापरावेत. देशकार्य करून देशाची भरभराट करावी.

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ)**

**(1)** (i) भूतकाळ (ii) भविष्यकाळ.

**(2)** (i) गाऱ्हाणी सांगणे – तक्रारी करणे.

(ii) भांबावून जाणे – गोंधळून जाणे.

**प्र. 3. (आ)**

**(1)** (i) रात्र = निशा (ii) निद्रा = झोप.

**(2)** वजनदार → जन नर

**(3)** अचूक शब्द → सौंदर्य.

**(4)** (i) ? → प्रश्नचिन्ह (ii) . → पूर्णविराम.

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**प्र. 4. (अ), (आ), (इ) :**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

# मराठी (आंतरभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (नोव्हेंबर 2020)

**वेळ : 2 तास]** **[एकूण गुण : 40**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

*(i) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(ii) आकृत्या पेनानेच काढाव्यात.*

*(iii) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.*

*(iv) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

---

## विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) 'मुख्याध्यापक' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.** 1

वयाच्या नवव्या वर्षी मी शाळेत गेले. गावातलेच वांदिले गुरुजी मुख्याध्यापक होते. पांढरेशुभ्र धोतर, त्यावर नेहरू शर्ट व डोक्यावर पांढरी टोपी असा त्यांचा पोशाख होता. वडिलांनी माहिती सांगितली. वांदिले गुरुजींनी माहिती लिहिली. अण्याजींचा त्यावर अंगठा घेतला आणि माझी शाळा सुरू झाली. शाळेत नाव घातलं, तरी म्हशी सांभाळायला जावंच लागायचं. सकाळी शाळा भरायच्या वेळी मला घंटा ऐकू येत असे. मला शाळेत जावंसं वाटायचं; पण जाता येत नसे. सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत व नंतर ३ ते ५.३० पर्यंत अशी दोन वेळा शाळा भरायची. सकाळची शाळा मला सापडत नसे. म्हशी चारायला गेलं की, शाळेजवळ खालच्या बाजूला जो छोटा डोह होता, त्यात म्हशी डुंबत बसत.

**(2) उत्तरे लिहा :** 2

(i) लेखिकेच्या शाळेची वेळ ----------------------

(ii) म्हशी डुंबण्याचे ठिकाण ---------------------

**(3) स्वमत :** 3

सिंधुताईंना शिकण्याची खूप तळमळ होती, हे पाठाच्या आधारे पटवून द्या.

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :** 2

(i) आर्की कागदावर काढत असलेली आकृती – [ ]

(ii) दगडाचा रंग – [ ]

शेजाऱ्याला वडील आणखी काही सांगत राहिले असते; पण तेवढ्यात आर्कीची आई तिथे आली. आपल्या मुलाला कोणी हसलेले, बोललेले तिला खपत नव्हते. ती ताडकन आर्कीच्या वडिलांना म्हणाली, ''तुम्ही आधी बाजारात जा पाहू. जा, बकरीचे दूध आणा. पोरे सकाळपासून उपाशी आहेत. दूध नाही मिळाले; तर मध आणा, जा.''

बायकोचा तो अवतार पाहून आर्कीच्या वडिलांनी काढता पाय घेतला. पुन्हा आर्कीने कागदात तोंड खुपसले व तो कागदावर वृत्तचित्ती वगैरे काढू लागला. समोरच्या रस्त्यावरची वर्दळ वाढत होती. ऊन सणसणीत तापू लागले होते. एकदम जोरजोरात आरडाओरड ऐकू आली, म्हणून आर्की रस्त्यावर गेला. पाहतो तो काय, एका भल्यामोठ्या काळ्या दगडाभोवती सारेजण गोळा झाले आहेत. हातवारे करीत आहेत. दगडाभोवती त्या लोकांनी खड्डा खणलेला होता.

**(2) कधी ते लिहा :** 2

(i) आर्कीच्या वडिलांनी काढता पाय घेतला. –

(ii) आर्की रस्त्यावर गेला. –

**(3) आकृती पूर्ण करा :** 2

**आर्कीच्या आईला आपल्या मुलाविषयी न खपणाऱ्या बाबी**

↓ [ ] ↓ [ ]

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1)** (i) केकतीच्या झाडावर उगवणारे फूल – ------------ 1

(ii) नारळ बाहेरून दिसतो – ------------ 1

| | |
|---|---|
| केकतीला कांट्याचे वेढे। | नारळ कठीण दिसे बाहेर। |
| भितरीं निपजती केवडे। | भितरीं खोबरें अरुवार। |
| तैसे साधूचे शब्द गाढे। | तैसें साधूचें अंतर। |
| परोपकारालागीं।। | बोधें वोसंडले।। |
| फणस सर्वांगीं कांटवले। | ऐसा सद्गुरुशीं धरा भाव। |
| भितरीं महा गोडीनें कोंदले। | तो कैसा करावा उपाव। |
| तैसें साधुहृदय जालें। | शेखमहंमद सांगती सेव। |
| बोधासंगें परियेसा।। | सभे श्रोत्यांप्रती।। |

**(2) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** 2

फणस सर्वांगीं कांटवले।

भितरीं महा गोडीनें कोंदले।

**प्र. 2. (आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) उत्तरे लिहा :**

(i) कवीने जपायला सांगितलेली गोष्ट – ---------------- 1

(ii) सर्वदूर ललकारी देण्यासाठी वापरावयाचे साधन – ---------------- 1

हा देश माझा याचे, भान जरासे राहू द्या रे ।।धृ।।
हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
ह्या गंगा, यमुना, शेती, धरती, बागबगीचा माझा
अभिलाषा यांची धरिता, कुणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया, स्फुरण आपल्या बाहू पावू द्या रे ।।१।।
जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहिसा अर्थही येऊ द्या रे ।।२।।
जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणुसकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी, फुंका रे एक तुतारी
संदेश रोष जे, द्वेष मनातील वाहून जाऊ द्या रे ।।३।।

**(2) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** **2**

जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणुसकीची नाती.

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) सूचनेनुसार सोडवा :**

(i) सुमेरा शाळेत जात आहे. *(काळ ओळखा.)* **1**

(ii) मी विद्यापीठ गेटमधून गेलो. *(भविष्यकाळ करा.)* **1**

**(2) पुढील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा :** **2**

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (i) निर्धार करणे | (अ) आश्चर्यचकित होणे |
| (ii) थक्क होणे | (आ) सक्ती करणे |
| | (इ) निश्चय करणे |

**प्र. 3. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) पुढे दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :** **1**

(i) नदी (ii) सत्य

**(2) पुढे दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून स्वतंत्र दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :** **1**

वजनदार → --------------------- ---------------------

**(3) पुढे दिलेल्या शब्दांमधून अचूक शब्द ओळखून लिहा :** **1**

निणर्य/निर्णय/निरणय/नीर्णय.

**(4) पुढे दिलेल्या विरामचिन्हांची नावे लिहा :** **1**

| विरामचिन्हे | विरामचिन्हांची नावे |
|---|---|
| (i) ? | ---------------- |
| (ii) ! | ---------------- |

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**प्र. 4. (अ) पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा :** **4**

• चित्रकला वर्ग •

'असरा' कलारंगतर्फे

चित्रकला वर्गाचे आयोजन

कालावधी १५ मे ते ३० मे

माफक दर

• संपर्क •

श्री. अबुल असरार हामीद

जयहिंद नगर, मानकापूर, पुणे.

भ्रमणध्वनी—९५९५० ०११११२

मेल आयडी—asrapune@gmail.com

साजीद/सलमा खान

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी या नात्याने चित्रकला वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र आयोजकांना लिहा. | *किंवा* | विद्यार्थी या नात्याने चित्रकला वर्गातील मार्गदर्शनाबद्दल आयोजकांचे आभार मानणारे पत्र लिहा. |

**प्र. 4. (आ) पुढीलपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** **4**

**(1) कथालेखन :**

• **पुढील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा :**

**मुद्दे :** *एक कोळी — मोठा मासा — राजाला भेट — लबाड पहारेकरी — मिळकतीचा अर्धा भाग मागतो — कोळी मान्य करतो — राजासमोर हजर — राजा किंमत विचारतो — चाबकाचे वीस फटके — आधी पहारेकऱ्याला — मग दहा कोळ्याला — राजाला आश्चर्य — कोळ्याचा खुलासा — पहारेकऱ्याला शिक्षा — कोळ्याला बक्षीस.*

**(2) गद्य आकलन :**

- **पुढील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल असे चार प्रश्न तयार करा :**

> विचाराने एखादी गोष्ट समजून दिली की, ती माणसाला पटते. समजावून देण्याऐवजी भय दाखवून, मार देण्याची भीती दाखवून पटवण्याचा प्रयत्न केला, तर भीती निर्माण होते; भीती न दाखवावी; तर माणूस स्वच्छंदी बनतो. सिंहाचे बळ त्याच्या दातांत आहे. हत्तीचे सामर्थ्य सोंडेत आहे. गाई-बैलांची शक्ती त्यांच्या शिंगात आहे, तसे मानवाचे सर्वस्व कोणते—तर माणसाची शक्ती, ती त्याच्या बुद्धीत आहे. निर्बुद्धपणाने वागून तो आपले सामर्थ्य न ओळखेल तर आपली शक्ती तो गमावून बसेल. माणसाच्या या बुद्धिसामर्थ्याला नीट मार्गावर ठेवण्यासाठी जो प्रयत्न केला जातो, तो सत्याग्रह किंवा सत्यदर्शन!

**(3) जाहिरातलेखन :**

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे 'शालेय भांडार'ची जाहिरात तयार करा :**

**मुद्दे :** *शालेय भांडार — शालेय उपयोगी सर्व वस्तूंची विक्री — सवलतीचे दर — विद्यार्थ्यांचा सहभाग.*


**(4) बातमीलेखन :**

तुमच्या शाळेत साजऱ्या झालेल्या २६ जानेवारी या राष्ट्रीय सणाची बातमी तुमच्या शब्दांत लिहा.


**प्र. 4. (इ) निबंधलेखन :**

- **पुढीलपैकी *कोणत्याही एका* विषयावर निबंधलेखन करा :** **4**

**(1) वर्णनात्मक :**




**(2) आत्मकथन :**




---

# बोर्डाच्या नोव्हेंबर 2020 च्या कृतिपत्रिकेची उत्तरे

## विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ)**

**(1)** वांदिले गुरुजी हे लेखिकेच्या शाळेत कोण होते?

**(2)** (i) सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत व नंतर ३ ते ५.३० पर्यंत.

(ii) शाळेजवळ खालच्या बाजूला असलेला छोटा डोह.

**(3)** लहानपणापासून सिंधुताईंना शिकण्याची खूप तळमळ होती. 'मला शाळेत जायचंय' असे त्या नेहमी म्हणत. त्या जिद्दीने शिकल्या. त्यांना वाचनाची खूप आवड होती. सासरच्या घरातील माणसे निरक्षर असल्यामुळे लेखिका स्वत:ची वाचनाची हौस पुरवू शकत नव्हत्या. सासरच्यांच्या जाचातून सुटका मिळवण्यासाठी त्या पुढे पुढे चोरून वाचायला लागल्या. त्यासाठी त्यांनी युक्ती शोधली. वाण-सामानाचे कागद त्या चोळामोळा करून उंदीर-घुशीच्या बिळात दडवून ठेवत. वाचनाच्या त्या अत्यंत भुकेल्या होत्या. एकदा गदिमांची कविता असलेला एक छापील कागद त्यांना सापडला. त्या ओळी त्यांना खूप आवडल्या. तो कागद बिळात लपवून ठेवताना त्यांच्या हाताला मुंगूस चावले. वाचनाची ओढ असल्यामुळे व सासरच्या निरक्षर लोकांचे न ऐकल्यामुळे त्यांना खूप मानसिक त्रास सोसावा लागला. त्यांच्या मनाला वेदना झाल्या; पण या ज्ञानाच्या ओढीने त्यांना संकटांतून बाहेर काढले.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) वृत्तचित्ती (ii) काळा

**(2)** (i) आर्कीच्या आईचा रागावलेला अवतार पाहून आर्कीच्या वडिलांनी काढता पाय घेतला.

(ii) रस्त्यावर जोरजोरात आरडाओरड ऐकू येऊ लागली; म्हणून आर्की रस्त्यावर गेला.

**(3)**

**आर्कीच्या आईला आपल्या मुलाविषयी न खपणाऱ्या बाबी**

- हसलेले
- बोललेले

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) केवडा (ii) कठीण

**(2) सरळ अर्थ :** फणसाच्या अंगभर काटे पसरलेले असतात; परंतु आत खूप रसाळ गरे गच्च भरलेले असतात.

**प्र. 2. (आ)**

**(1)** (i) माणुसकीची नाती (ii) तुतारी

**(2)** सरळ अर्थ : आपल्या भारत देशात अनेक धर्मांचे व अनेक जातींचे लोक नांदत आहेत, पण आपले माणुसकीचे नाते, आपल्यातील सर्वधर्मसमभाव कायम अतूट राहू दे.

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ)**

**(1)** (i) वर्तमानकाळ.

(ii) मी विद्यापीठ गेटमधून जाईन.

**(2)** (i) निर्धार करणे – निश्चय करणे.

(ii) थक्क होणे – आश्चर्यचकित होणे.

**प्र. 3. (आ)**

**(1)** (i) नदी = सरिता (ii) सत्य = खरे.

**(2)** वजनदार → जन वर.

**(3)** निर्णय.

**(4)**

| विरामचिन्हे | विरामचिन्हांची नावे |
|---|---|
| (i) ? | प्रश्नचिन्ह |
| (ii) ! | उद्‌गारचिन्ह. |

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**प्र. 4. (अ), (आ), (इ) :**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.